# मानव विकास व
# मानव विकास निर्देशांक

## सुस्वागतम्

डॉ. अतुल नौबदे
मानव विकास केंद्र, यशदा, पुणे

# मानव विकास व्याख्या

१. डॉ. मेहबूब उल हक्क यांच्या मते, विकासाचा मुख्य उद्देश मानवास जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे. या संधी अमर्याद व वेळेनुरूप बदलता येणाया असाव्यात. मानवाची मिळकत ही उत्पन्न वाढीच्या अंकात दिसण्याऐवजी त्यांत ज्ञान वृध्दी, उत्तम आहार व आरॊग्य सुविधा, सुरक्षित जीवनमान, शारीरिक वेदना व गुन्हेगारीपासून सुरक्षितता, फावला वेळ घालविण्याचे समाधान, राजकीय व सास्कृतिक स्वातंत्र्य आणि समाजात मिसळण्याची जाणीव यात दिसेल. तसेच विकासाचा मुख्य उद्देश मानवासाठी अशा समाजिक वातावरणाची निर्मिती करणे ज्यात आरॊग्यसंपन्न व नाविण्यपूर्ण जीवन जगता येईल.

२. डॉ. अमर्त्य सेन याच्या मते, मानव विकास हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्यात मानव जीवनाचा एक भाग असलेल्या अर्थव्यवस्थेच्या विकासापेक्षा तेथील मानव जीवन वृध्दिंगत/विकसित होणे गरजेचे आहे.

३. मानव विकास अहवाल १९९० नुसार, मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाया संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया होय.

४. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ नुसार, ‘’“मानव विकास म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूसाठी दिलेला लढा आणि त्यांची प्रत्यक्षात झालेली पूर्तता, याचा मिलाप होय

# मानव विकास निर्देशांक : व्याख्या

१. लोकांचे आरोग्य, शिक्षणाचा कालावधी, साक्षरतेचे प्रमाण व दरडोई उत्पन्न इ. च्या मूल्यात होणाया बदलांचे मापन करण्यासाठी जी गणितीय पध्दती उपयोगात आणली जाते, तिला मानव विकास निर्देशांक म्हणतात.

२. मानव विकास निर्देशांक म्हणजे सरासरी आयुर्मान निर्देशांक, शिक्षणाची प्राप्ती निर्देशांक व जीवनमान निर्देशांक या तिन्हीची समभारीत सरासरी होय.

# महाराष्ट्र : मानव विकास निर्देशांकाची मानके

| अ. क्र. | माप | किमान मूल्य | कमाल मूल्य |
| --- | --- | --- | --- |
| १ | अर्भक मृत्यू दर | ० | १००० |
| २. | साक्षरता दर | ० | १०० |
| | सरासरी पटनोंदणी प्रमाण | ० | १०० |
| ३. | दरडोई निव्वळ जिल्हातर्गत उत्पन्न (स्थिर किमतीनुसार) | रु. १०,०००/- | रु. १५००००/- |

संदर्भ : महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२

# देशांची वर्गवारी

| अ.क्र. | निर्देशांकाचे मूल्य | वर्गवारी |
|---|---|---|
| १. | १ – ०.९ | अत्युच्च विकसित |
| २. | ०.९ - ०.८ | उच्च विकसित |
| ३. | ०.८ – ०.५ | मध्यम विकसित |
| ४. | ०.५ पेक्षा कमी | अल्प विकसित |

संदर्भ : डॉ. विनायक गोविलकर, 'मानव विकास निर्देशांक अर्थबोध, (२००९) दैनिक सकाळ

# मानव विकास निर्देशांक गणना

$$\text{‘अ’ घटकाचा निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - लघुतम मूल्य}}{\text{महतम मूल्य - लघुतम मूल्य}}$$

**Normalized Score = Actual Value – Minimum Value / Range**

$$\text{Normalized Score} = \frac{\text{Actual Value} - \text{Minimum Value}}{\text{Range}}$$

**Where Range = (Maximum value – Minimum value)**

# मानव विकास निर्देशांक वृध्दीमधील भूमिका

- मानव विकासासाठी आवश्यक धोरणे
- उत्पन्न
- शिक्षण
- आरोग्य
- इतर

# धन्यवाद!

